# मृत्युपूर्व जबाब

महसूल खात्यामध्ये काहीवेळा मृत्युपूर्व जबाब घ्यावा लागतो. परंतू याबाबत पूरेसे ज्ञान नसल्याने न्यायालयात साक्ष देतांना गोंधळ उडतो, निकालपत्रात ताशेरे ओढले जातात व आरोपीच्या बाजूने निकाल दिला जातो. मृत्युपूर्व जबाबाबाबत काही माहिती खालील प्रमाणेः

मरणाच्या दारात उभी असलेली व्यक्ती खोटे बोलत नाही असे कायदाही मानतो त्यामुळे मृत्युपूर्व जबाबाला फार महत्व आहे. एखाद्या मरणोन्मुख व्यक्तीने मृत्युपूर्व जबाब देण्याची ईच्छा व्यक्त केली तर लगेच दंडाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याला बोलवले जाते. तितका वेळ नसेल तर डॉक्टर किंवा अन्य प्रतिष्ठित व्यक्तीसुध्दा दोन निष्पक्ष साक्षीदारांच्या समक्ष मृत्युपूर्व जबाब घेऊ शकते.

मृत्युपूर्व जबाब या नावावरून तो जबाब आहे हे स्पष्ट होते. यात मरणोन्मुख व्यक्ती स्वतःच्या मृत्युच्या पार्श्वभूमीविषयी हकीकत विषद करतो.

मृत्युपूर्व जबाब सुरु करण्यापूर्वी डॉक्टरकडुन दोन दाखले अवश्य घ्यावे.

१. "श्री/श्रीमती -------------- या मृत्युपूर्व जबाब देण्यासाठी मानसिकरित्या सक्षम (compos mentis) आहे असे मी प्रमाणित करतो."

व मृत्युपूर्व जबाब संपल्यानंतर डॉक्टरकडुन

२. "श्री/श्रीमती -------------- यांचा मृत्युपूर्व जबाब घेण्यात आला तेव्हा ते/त्या मृत्युपूर्व जबाब देण्यासाठी देण्यासाठी मानसिकरित्या सक्षम होते/होत्या. त्यांचा मृत्युपूर्व जबाब त्यांना वाचून दाखवण्यात आला व तो योग्यरित्या नोंदवला आहे असे त्यांनी मान्य केले."

- मृत्युपूर्व जबाब हा डॉक्टर आणि दोन निष्पक्ष साक्षीदारांच्या समक्ष घ्यावा.
- मृत्युपूर्व जबाब हा लेखी असावा.
- मृत्युपूर्व जबाब घेतांना, जबाब देणाऱ्या व्यक्तीस काहीही सुचवू किंवा सूचक प्रश्न विचारु नये.
- जबाब देणारी व्यक्ती बोलण्याच्या स्थितीत नसेल तर खुणांनी उत्तरे द्यायला सांगावीत आणि ती खुणा आणि प्रस्तावनेसह लिहून घ्यावीत. अशा वेळी शक्यतो व्हिडिओ चित्रीकरण करावे.
- जबाब संपल्यानंतर त्यांना वाचून दाखवण्यात यावा व तो योग्यरित्या नोंदवला आहे कां असे विचारून त्यांची मान्यता घ्यावी.
- जबाब संपल्यानंतर जबाबावर जबाब देणाऱ्याची स्वाक्षरी व अंगठासुध्दा घ्यावा. नंतर त्यावर डॉक्टर व साक्षिदारांची स्वाक्षरी घ्यावी.
- जर जबाब घेतांना मधेच जबाब देणारा मृत किंवा बेशुध्द झाला तर झालेल्या जबाबावर त्याप्रमाणे नमूद करून त्यावर डॉक्टर व साक्षिदारांची स्वाक्षरी घ्यावी.
- मृत्युपूर्व जबाब घेतांना पोलिसांना हजर ठेऊ नये.
- मृत्युपूर्व जबाब सुरु करतांना शक्यतो खालील प्रश्न विचारावेत व त्याची उत्तरे नमुद करावीत.
  १. तुमचे नाव काय आहे?
  २. तुमचे वय काय आहे?
  ३. तुमचा पत्ता काय आहे?

४. आत्ता तुम्ही कोठे आहात हे माहित आहे काय? कोठे?
५. घटनेचे ठिकाण आणि वेळ
६. तुम्ही पूर्ण शुध्दिवर आहात काय?
७. मी दंडाधिकारी आहे हे तुम्हाला समजले काय?
८. तुमची मानसिक स्थिती जबाब देण्यासारखी आहे काय?
९. तुम्हाला जबाब द्यायचा आहे काय?
१०. तुम्ही स्वखुशीने जबाब देत आहात काय?
११. तुमच्यावर कोणाचा दबाब आहे काय?
१२. काय घटना घडली त्याचे वर्णन करा.
१३.तुमची कोणाविरूध्द तक्रार आहे काय?

==================================================================